महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २८

# महाराजा सयाजीराव आणि धर्मानंद कोसंबी

## निलोफर मुजावर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २८

# महाराजा सयाजीराव आणि धर्मानंद कोसंबी

निलोफर मुजावर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि धर्मानंद कोसंबी
इतिहास
निलोफर मुजावर
●
प्रकाशन क्रमांक - ४८
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : निलोफर मुजावर
टी. के. आय. ई. टी स्टाफ निवास
कॉलेज रोड, वारणानगर
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ४१६११३
मो.८९५६५८१६०९
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव आणि धर्मानंद कोसंबी

आधुनिक भारतातील बौद्ध धर्माचा इतिहास विचारात घेता बाबासाहेब आंबेडकर हेच नाव प्राधान्याने पुढे येते. याचे कारण त्यांचे १९५६ चे ऐतिहासिक धर्मांतर हे आहे. परंतु आधुनिक काळात बुद्ध चरित्राच्या अभ्यासाचा पहिला मान कृष्णराव अर्जुन केळुसकर यांना जातो. कारण आधुनिक काळात कोणत्याही भारतीय भाषेत आणि भारतीयाने लिहिलेले गौतम बुद्धाचे पहिले चरित्र केळुसकरांनी लिहिले होते. ते लक्ष्मणराव पांडुरंग नागवेकर यांनी त्यांच्या कर्नाटक प्रेसद्वारे १८९८ ला प्रकाशित केले. भारतातील बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाची खऱ्या अर्थाने सुरुवातच होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची कालातीतता ओळखून याच दरम्यान बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाला आरंभ केला. १८९८ मध्ये केळुसकर हे बुद्ध चरित्र घेऊन मुंबई येथे सयाजीरावांना भेटले होते. सयाजीरावांनी त्यांचे बुद्धचरित्र चाळून केळुसकरांशी

बौद्ध धर्मावर चर्चा केली. केळुसकर त्यांच्या आत्मचरित्रात ही आठवण सांगताना सयाजीरावांचे बौद्ध धर्माचे ज्ञान १८९८ ला परिपूर्ण होते असा अनुभव नोंदवतात.

केळुसकरांचे हे बुद्धचरित्र वाचून मुंबईचे डॉ. ए. एल. नायर, धर्मानंद कोसंबी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञानाकडे वळले. हा इतिहास फारच क्रांतिकारक आहे. २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात दक्षिण भारतात बौद्ध धर्म साहित्य आणि तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासाने गती घेतली. पुढे राहुल सांस्कृतायण यांनी नेपाळ, तिबेट यासारख्या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात बौद्ध साहित्य भारतात आणले. या सर्व पार्श्वभूमीवर १९५६ चे बाबासाहेबांचे धर्मांतर झाले.

केळुसकरांकडून प्रेरणा घेऊन कोसंबींनी बौद्ध साहित्य आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रात मोठे योगदान दिले. बौद्ध धर्म आणि पाली भाषा यांच्या प्रसाराची सयाजीरावांनी कोसंबींना दिलेली जबाबदारी हा एक महत्त्वाचा टप्पा होता. सयाजीरावांनी त्यांच्या प्राच्यविद्या संस्थेतर्फे बौद्ध धर्मासाठी केलेले काम, पाली भाषेला राजाश्रय, मराठीत सर्वाधिक बौद्ध धर्मविषयक ग्रंथांचे प्रकाशन आणि महत्त्वाचे म्हणजे महाराजांचा स्वतःचा बौद्ध धर्मविषयक व्यासंग याबाबत आपल्याकडे फार मोठे अज्ञान आहे. म्हणूनच सयाजीराव आणि कोसंबी यांचा बौद्धधर्म केंद्रस्थानी ठेवून विचार करणे आवश्यक ठरते.

## पहिली भेट

धर्मानंद कोसंबी व सयाजीराव महाराज यांची पहिली भेट कलकत्ता येथे डिसेंबर १९०६ मध्ये झाली. त्यावेळी महाराज कलकत्ता औद्योगिक परिषदेसाठी आले होते. ही भेट श्रीयुत सत्येंद्रनाथ टागोर आय.सी.एस. यांच्यामुळे शक्य झाली होती. प्रथम कोसंबी टागोरांसोबत जेव्हा महाराजांना भेटायला गेले त्यावेळी महाराजा बाहेर गेले असल्याने त्यांची महाराजांशी भेट होऊ शकली नाही. महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी मनुभाई मेहता यांची भेट घेऊन कोसंबींना परतावे लागले. त्यानंतर दोन-तीन दिवसांनी मनुभाई मेहता यांनी कोसंबींची आणि महाराजांची भेट घडवून आणली. या भेटी वेळी मात्र कोसंबींना पुरेसा वेळ देणे महाराजांना शक्य झाले नाही. या भेटीत महाराज कोसंबींना म्हणाले, 'तुम्ही एकदा बडोद्याला या. पुष्कळ गोष्टी तुमच्याशी मला बोलावयाच्या आहेत.' वेळेअभावी झालेल्या या प्राथमिक भेटीत महाराजांनी कोसंबींना विस्तृत भेटीसाठी बडोद्याला बोलाविले.

१९०७ मध्ये कोसंबी बडोद्याला पोहोचले तेव्हा महाराज शिकारीवर गेले होते. त्याच दरम्यान महाराजांच्या चुलतीचे निधन झाले. त्यामुळे ८-१० दिवस कोसंबींना वाट पाहावी लागली. दरम्यान महाराजांना कोसंबी बडोद्यात आल्याचे कळताच

चुलतीच्या मरणाच्या तिसऱ्या दिवशी कोसंबींना भेटीला बोलवून घेतले. चुलतीच्या मृत्यूमुळे व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवता येत नव्हता. त्यामुळे विस्तृत चर्चा झाल्यानंतर महाराजांनी कोसंबींना सांगितले की या बाजूला पुन्हा आल्यानंतर भेटल्याशिवाय जाऊ नका. यावेळी महाराजांनी कोसंबींना जाण्यायेण्याच्या खर्चासाठी १६० रु. दिले आणि कोसंबी कलकत्याला निघून गेले.

कलकत्याला गेल्यानंतर कोसंबींचा महाराजांशी काहीही पत्रव्यवहार होऊ शकला नाही. पुढे एक वर्षाने कोसंबींना कलकत्याला बडोद्याच्या हुजूरकामदाराचे एक पत्र आले. या पत्रात 'महाराज सरकार अधूनमधून तुमची आठवण काढीत असतात व या बाजूला आल्यास तुम्ही बडोद्याला येऊन भेटावे अशी त्यांची इच्छा आहे' असा उल्लेख केला होता. परंतु कोसंबींना त्यावेळी कॉलेजमधील कामाच्या व्यग्रतेमुळे महाजांच्या इच्छेनुसार बडोद्याला जाणे तत्काळ शक्य नव्हते. त्यामुळे कोसंबींनी महाराजांच्या' पत्राला उत्तर देत महाराजांशी भेटण्याची त्यांचीही इच्छा असल्याचे कळविले. या पत्रात कोसंबी लिहितात, 'सध्या महाराजसाहेबांना भेटता येणे शक्य नाही. परंतु उन्हाळ्याची सुटी झाल्यानंतर भेटता येईल. त्यापूर्वी महाराजांची स्वारी कोठे आहे याची चौकशी करून मी भेटीस येईन.'

## कोसंबी बडोद्यात

पुढे १९०८ मध्ये जुलै महिन्यात कोसंबींनी बडोद्याला जाऊन सयाजीरावांची भेट घेतली. या भेटीवेळी महाराजांनी कोसंबींना बडोद्याच्या न्यायमंदिरात एक व्याख्यान देण्याची सूचना केली. महाराज स्वत: कोसंबींच्या या व्याख्यानास हजर राहणार होते. परंतु ऐनवेळी काही काम निघाल्याने महाराजांना या भाषणास उपस्थित राहता आले नाही. कोसंबींच्या व्याख्यानानंतर तेथे याचवेळी आणखी काही व्याख्याने झाली त्या व्याख्यानांवरून कोसंबींच्या भाषणाचा चांगला प्रभाव पडला होता हे लक्षात येते.

या व्याख्यानानंतर कोसंबींची आणि महाराजांची राजवाड्यामध्ये भेट झाली. या भेटीदरम्यान कोसंबींना महाराजांनी विचारले, 'कलकत्ता सोडून इकडे काही काम करण्याची तुमची इच्छा आहे काय?' यावर कोसंबी म्हणाले, 'पैसा मिळवून श्रीमंत होण्याची मला मुळीच इच्छा राहिली नाही. माझ्या आवडीचे काम मला मिळाले आणि निर्वाहापुरता पैसा मिळाला तर ते मला हवे आहे.' या उत्तरावरून महाराजांना कोसंबींची भूमिका लक्षात आली. त्यामुळे कोसंबींनी बडोद्यास राहण्यासाठी यावे असे महाराजांना वाटत होते. कोसंबींना पूर्णपणे सहकार्य करण्याच्या उद्देशाने महाराज पुढे म्हणाले, 'तुम्ही येथे येऊन राहात असाल तर तुम्हाला मी सर्व प्रकारे मदत करण्यास तयार आहे.' परंतु कोसंबींनी सांगितले की, 'मी बडोद्यालाच राहावे, अशी अट

महाराजांनी घालू नये. मी कोठे असलो तरी बौद्ध धर्माचे ज्ञान आमच्या महाराष्ट्र बांधवांना करून देणे, या माझ्या कर्तव्यास मुकणार नाही. तेव्हा पुणे-मुंबईसारख्या ठिकाणी राहून माझे काम मला करू द्यावे व निर्वाहापुरती बडोदे सरकारकडून मला मदत व्हावी.'

## सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीवर महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार

कोसंबींच्या या निवेदनावर महाराजांनी त्यांचे मत स्पष्टपणे मांडले नाही. त्यानंतर लगेचच महाराज पुण्यास निघून गेले आणि कोसंबीही कलकत्याला गेले. त्यानंतर पंधरा-वीस दिवसांनी कोसंबींना महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीमार्फत तातडीची तार आली. या तारेतून कोसंबींना एक हुकूम प्राप्त झाला. तो हुकूम पुढीलप्रमाणे होता, 'तुम्ही महाराष्ट्रातील कोणत्याही शहरी राहात असाल तर तुम्हाला बडोदे सरकारांतून दरमहा ५० रुपये मिळतील, व ही मदत तीन वर्षेपर्यंत चालू राहील. मात्र वर्षातून एखादे पुस्तक बडोदे सरकारसाठी तुम्ही लिहून तयार केले पाहिजे.' ही तार कोसंबींपर्यंत उशिराने पोहोचली. ही तार पोहोचताच सेक्रेटरींकडून 'पहिल्या तारेचे उत्तर ताबडतोब पाठवावे' अशी दुसरी तार आली. यावरून कोसंबींना महाराजांची इच्छा लक्षात आली. त्यामुळे कोसंबींनी कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू हरिनाथ देव जस्टिस मुकर्जी यांना त्यांचा उद्देश सांगितला आणि सयाजीराव महाराजांनी देऊ केलेले वेतन

स्वीकारले. महाराजांनी केलेल्या आर्थिक मदतीबद्दल कोसंबींनी लगेचच तार पाठवून महाराजांचे आभार मानले. यानंतर कोसंबींनी एक महिना कलकत्यास राहून पुण्याला जाण्याची इच्छा महाराजांकडे पत्राद्वारे व्यक्त केली. यास महाराजांनी कोणतीही हरकत न घेता कोसंबींना सहमती कळवली.

सयाजीराव महाराजांनी दिलेल्या मदतीमुळे कोसंबी कलकत्ता विद्यापीठातून निघून जाऊ नयेत म्हणून कलकत्ता विद्यापीठाने कोसंबींचा पगार १०० रु. वरून २५० रु. केला आणि कोसंबींनी ३ वर्षे कलकत्याला राहावे अशी हमी मागितली. कारण कोसंबी कलकत्ता विद्यापीठात राहिले तर पाली भाषेच्या प्रसाराचे काम अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकते असे कुलगुरूंचे मत होते. तसेच त्यांनी 'युनिव्हर्सिटीचा व्हाइस चान्सेलर या नात्याने मी तुम्हास आणखी तीन वर्षे येथे ठेवण्याविषयी महाराजांस विनंती करतो.' असे सांगितले होते. मात्र 'श्रीमंत गायकवाड महाराजांचा निरोप येथून मागविणे मला रास्त वाटत नाही. मी त्यांना भेटून, जे काही होईल, ते तुम्हास कळवितो.' अशी भूमिका कोसंबींनी घेतली. त्यामुळे कुलगुरूंनी कोसंबींकडे सयाजीराव महाराजांना देण्यासाठी एक पत्र लिहून दिले. या पत्रात कोसंबी कलकत्त्याला राहिल्याने फार फायदा आहे अशा आशयाचा मजकूर होता.

कलकत्ता विद्यापीठाला राजीनामा पाठवून जस्टिस मुकर्जी व हरिनाथ देव यांचा निरोप घेऊन कोसंबी ऑक्टोबर १९०८

मध्ये मुंबईला गेले. काही काळ मुंबईत राहून मार्च १९०९ मध्ये ते पुण्यास आले. यादरम्यान कोसंबींनी ‘विशुद्धिमार्गाचा’ बराच भाग मराठीत लिहून काढला. तसेच त्यांनी ‘बोधिचर्या-अवतारा’चे मराठी भाषांतर केले आणि संस्कृत भाषेत एक लहानसे पाली व्याकरणदेखील लिहिले. पुढे १९०९ मध्येच धर्मानंदांनी बडोद्यात विविध ठिकाणी बौद्ध धर्मावर ५ भाषणे दिली. त्यातील ३ भाषणे ‘बुद्ध, धर्म आणि संघ’ या नावाने ग्रंथ रूपाने प्रसिद्ध करण्यात आली. हा ग्रंथ छापण्यासाठी सयाजीराव महाराजांनी कोसंबींना ५०० रु.ची देणगी दिली. सयाजीराव हे जरी बडोदा संस्थानचे राजे असले तरी त्यांना मातृभूमी म्हणून महाराष्ट्राबद्दलची कळवळ अगदी सुरुवातीपासूनच होती. महाराष्ट्रसुद्धा बौद्धिकदृष्ट्या समृद्ध व्हायला हवा ही दृष्टी यामागे होती. बौद्ध धर्माबद्दल फार पूर्वीपासूनच सयाजीरावांच्या मनात आदर होता.

केळुसकर हे बुद्ध अभ्यासातील कोसंबींची पहिली प्रेरणा होते. या संदर्भात मराठी विश्वकोशातील नोंदीत केळुसकर आणि ‘आध्यात्मिक ज्ञानरत्नावली’ ही दोन्ही नावे टाळून कोसंबी शिष्य पु.वि. बापट यांनी पुढील विधान केले आहे. ‘१८९७ मध्ये एका मराठी नियतकालिकातील गौतम बुद्धावरील लेख वाचून, त्यांचे बौद्ध धर्माविषयी कुतूहल जागृत झाले.’ हे बुद्ध चरित्र १८९७ मध्ये ‘आध्यात्मिक ज्ञानरत्नावली’ या मासिकातून प्रथम क्रमशः प्रकाशित झाले होते. कोसंबींना १९०८ ते १९११

अशी तीन वर्षे बौद्ध धर्माचा महाराष्ट्रात प्रसार आणि ग्रंथलेखन करण्यासाठी महाराजांनी वरील शिष्यवृत्ती दिली होती. तसेच महाराजांनी १९१० मध्ये बडोद्यात बुद्धाचा पुतळा जपानहून आणून बसविला. या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर बौद्ध धर्माची तत्त्वे कोरलेली होती. या पार्श्वभूमीवर पुढे १९५६ चे बाबासाहेबांचे बौद्ध धर्मांतरसुद्धा आपल्याला विचारात घ्यावे लागेल.

## कोसंबी अमेरिकेत

१९१० मध्ये धर्मानंदांनी अमेरिकेत हार्वर्ड विद्यापीठात प्रा. वारन यांच्या बौद्ध धर्मातील 'विशुद्धीमार्ग' या ग्रंथावरील संशोधनात सहकार्य करण्यासाठी बोलविण्यात आले. सयाजीराव महाराजांची परवानगी घेऊन ते १९१० मध्ये हार्वर्ड विद्यापीठात गेले. त्याच दरम्यान महाराज जपानला निघाले होते. महाराज पुढे जपानवरून अमेरिकेला जाणार असल्याने कोसंबींना ते स्वतःबरोबर येण्याचा आग्रह करत होते. परंतु त्यांची प्रवासाची व्यवस्था हार्वर्ड विद्यापीठाने केली असल्याने ते स्वतंत्रपणे अमेरिकेला गेले. अमेरिकावारीला परवानगी देऊन सयाजीरावांचा हातभार लागला. ती बौद्ध धर्माच्या कामासाठी व त्यांचा मुलगा दामोदर यांच्या शिक्षणासाठी फलदायी ठरली. पुढे दामोदर कोसंबी मार्क्सवादी इतिहासकार म्हणून जगविख्यात झाले. यासंदर्भात कोसंबी म्हणतात, 'दरमहा २५० रुपयांची नोकरी सोडून श्रीमंत गायकवाड महाराजांनी दिलेल्या ५०

रुपयांच्या वेतनाचा स्वीकार केल्याबद्दल मला कधींही पश्चात्ताप झाला नाही. हे वेतन स्वीकारले नसते तर डॉ. वुड्स यांची गाठ पडली नसती आणि अमेरिकेला जाण्याची संधी सापडली नसती. पुण्याला येऊन राहिल्यामुळे डॉ.भांडारकर यांचा निकट संबंध जडला व त्यांच्या प्रयत्नाने मुंबई युनिव्हर्सिटीत पाली भाषेचा प्रवेश करता आला.

महाराष्ट्र देशबांधवांची सेवा करण्याची माझी उत्कट इच्छा अंशतः तरी तृप्त होण्यास श्रीमंत गायकवाड महाराजांचाच आश्रय कारणीभूत झाला आहे आणि या प्रांतात पाली भाषेच्या प्रसाराचे पुष्कळसे श्रेय त्यांना देणे योग्य आहे.'

सयाजीरांवाकडून महाराष्ट्राबरोबरच भारतालाही झालेले हे महत्त्वाचे योगदान आजपर्यंत महाराष्ट्राला अज्ञात आहे. कारण कोसंबींची ही अमेरिकावारी महाराष्ट्राबरोबरच भारतालाही लाभदायक ठरली असे आज मागे वळून पाहताना जाणवते. कारण १९१२ मध्ये धर्मानंद अमेरिकेहून परतले. अमेरिकेतून परतल्यानंतर कोसंबींनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरी करावी अशी विठ्ठल रामजी शिंदे यांची इच्छा होती. शिंदेंनी धर्मानंदांची शिफारस करून फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर केशवराव कानिटकर यांना पत्रही लिहिले. त्यानंतर कोसंबींनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. कारण त्यादरम्यान पुण्यात पाली भाषेच्या प्रसारासाठी ही चांगली संधी असल्याने त्यांना शिंदेंची कल्पना आवडली होती.

## सयाजीरावांची पाली भाषेसाठी शिष्यवृत्ती

धर्मानंद कोसंबींना फर्ग्युसन कॉलेजमध्ये इतर प्राध्यापकांपेक्षा दरमहा २५ रु. कमी वेतनावर ही नोकरी देण्यात आली. याच दरम्यान सयाजीराव महाराज मुंबईत आले होते. त्यावेळी कोसंबींनी महाराजांना भेटून हे सर्व सांगितले. कमी पगारावर नोकरी स्वीकारल्याबद्दल महाराज त्यांना रागावले. महाराज म्हणाले, ‘हे तुम्ही काय केलेत? नोकरी स्वीकारण्यापूर्वी तुम्ही मला भेटायला नको होते काय? अमेरिकेला हार्वर्ड युनिव्हर्सिटीत नोकरी करून आलात, आणि आता दरमहा ७५ रुपये आपली किंमत ठरविता, हे तुम्हास योग्य वाटते काय?

महाराजांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कोसंबींनी त्यांचे समाधान करण्याच्या उद्देशाने आपली भूमिका महाराजांपुढे विस्ताराने मांडण्याचा प्रयत्न केला. यावेळी कोसंबी महाराजांना म्हणाले, ‘महाराजसाहेब, आल्याबरोबर मी आपणास भेटलो नाही ही चूक झाली. तिजबद्दल मला क्षमा करावी. परंतु फर्ग्युसन कॉलेजांत नोकरी पत्करण्यात माझी चूक झाली असे वाटत नाही. पगारावरून किंमत ठरवण्यात आली तर आगरकर, गोखलेप्रभृतींची किंमत फारच कमी ठरेल! मला वाटते की, माझ्या कार्यावरून माझी किंमत ठरेल, पगारावरून ठरणार नाही. माझ्या कार्यात यश आले नाही, तर निदान मोठ्या पगाराने स्वतःचा फायदा करून घेतला, हा आळ तरी येणार नाही.’ कोसंबींच्या या स्पष्टीकरणानंतर मात्र महाराज कोसंबींवर रागावले नाहीत.

यानंतर कोसंबींनी महाराजांना फर्ग्युसन कॉलेजमधील पाली भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची विनंती केली. महाराजांनी ही विनंती मान्य करून दर महिन्याला १५ रु. च्या २ आणि १० रु. च्या २ अशा एकूण ४ शिष्यवृत्ती फर्ग्युसन कॉलेजमध्ये सुरू केल्या. या चार शिष्यवृत्ती १९१२ ते १९१८ या कालावधीत कोसंबी या कॉलेजमध्ये नोकरीत असेपर्यंत चालू राहिल्या. विशेष म्हणजे मुंबई प्रांतातील हे एकमेव कॉलेज होते जेथे पाली भाषा शिकविली जात होती. कोसंबींमुळे फर्ग्युसन कॉलेज पाली भाषा सुरू करू शकले.

अजून एका बाबीचा उल्लेख येथे मनोरंजक ठरतो. १९१२ मध्ये कोसंबींनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत कार्ल मार्क्सवर भाषण दिले. तो कार्ल मार्क्सचा भारताला परिचय करून देण्याचा पहिला सार्वजनिक प्रयत्न होता. कॉ.डांगे यांनी मार्क्सच्या विचारधारेवरील ‘सोशॅलिस्ट’ हे नियतकालिक १९२२ ला सुरू केले व १९२५ ला भारतीय मार्क्सवादी पक्षाची स्थापना केली. म्हणजे डांगेंच्या अगोदर दहा वर्षे कोसंबींनी मार्क्स भारतात आणला. कोसंबींना मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा परिचय अमेरिकेत झाला. म्हणजेच मार्क्सच्या भारतातील आगमनास सयाजीरावांचा हातभार होता असे म्हणता येईल. कोसंबी पुढे एकूण चार वेळा बौद्ध धर्माच्या अभ्यासानिमित्त अमेरिकेला गेले.

## सयाजीराव आणि बौद्ध धर्म

सयाजीरावांनी महाराष्ट्राला काय दिले याचा शोध घेण्याच्या या प्रवासातील ‘कोसंबी’ हा थांबासुद्धा महाराष्ट्राला उपयुक्त ठरला. कारण धर्मानंद आणि सयाजीराव यांच्या १९०६ पासूनच्या नात्याचा धागा बौद्ध धर्म हाच होता. ज्यावर्षी कोसंबी बौध्द धर्मावरील संशोधनाला मदत करण्यासाठी सयाजीरावांच्या परवानगीने अमेरिकेला गेले त्याचवर्षी महाराजांनी बडोद्याच्या ज्युबिली बागेत बुद्धाचा पुतळा बसविला. साधारणपणे १८९८ पूर्वीपासूनच सयाजीरावांचा बुद्धाशी चांगला परिचय होता असे केळुसकर चरित्र आधारे म्हणता येईल. सयाजीरावांनी पाली भाषेतील बौद्ध ग्रंथांचे मराठी अनुवाद अग्रक्रमाने प्रकाशित करण्याची सूचना यंदे यांना दिली होती. त्यांच्या धर्मविषयक भाषणात बुद्धाचा गौरवाने उल्लेख वारंवार आढळतो हा अपघात नाही. महाराजांनी महाराष्ट्रात बौद्ध धर्म प्रसारासाठी बाबासाहेबांच्या धर्मांतरापूर्वी ५० वर्षे साहाय्य करून चांगली सुरुवात केली होती असे म्हणता येईल. त्यामुळे बौद्ध धर्माचा महाराष्ट्रालाच काय आधुनिक काळात भारताला परिचय करून देणारे पहिले प्रशासक म्हणूनही त्यांचे योगदान मोठे होते. कोसंबी हा त्यातील एक टप्पा होता इतकेच.

## धर्मानंद कोसंबी : ऋण नाकारणारे अनुयायी

केळुसकरांचे १८९८ मध्ये प्रकाशित झालेले फक्त मराठीतीलच नव्हे तर कोणत्याही भारतीय भाषेतील पहिले बुद्ध चरित्र वाचून धर्मानंद कोसंबी, डॉ. आनंदराव नायर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वजण बुद्धाशी जोडले गेले. केळुसकरांचे मराठी संस्कृतीला हे फार मोठे योगदान आहे. याची चर्चा आपण मागे केलीच आहे. बुद्धाच्या समतावादी विचाराशी सयाजीरावांचे अगदी सुरुवातीपासूनचे नाते होते. बुद्ध साहित्याला बडोद्यातील साहित्य प्रकाशनात महाराजांनी अग्रक्रम दिला होता. केळुसकरलिखित 'गौतमबुद्धाचे चरित्र' वैज्ञानिक दृष्टीने बुद्धाचा शोध घेणारे असल्यामुळे आजही त्याचे मोल कमी झालेले नाही.

या चरित्राबाबत 'एवढ्या आवडीने, प्रेमाने आणि प्रचंड जीव ओतून आपण दुसरा ग्रंथ लिहिलेला नाही' असे स्वतः केळुसकरांनी म्हटले आहे. या ग्रंथात बुद्धाचे समग्र चरित्र असून बौद्ध धर्माच्या मतांचा सारांश व त्याच्या प्रसाराचा संक्षिप्त इतिहास केळुसकरांनी दिला आहे. बुद्ध चरित्रात लेखकाचे अफाट वाचन, मूलगामी विचार, वैचारिक सामर्थ्य आणि समर्थ लेखणीचे दर्शन घडते. मराठी भाषेतील हा एक उत्कृष्ट चरित्र ग्रंथ असल्याचे मत तत्कालीन अनेक तज्ज्ञांनी नोंदवले होते. बडोद्याच्या दक्षिणा प्राइज कमिटीने या ग्रंथास पारितोषिक देऊन गौरविले होते.

धर्मानंद कोसंबी यांनी केळुसकरलिखित बुद्ध चरित्र डॉ. भांडारकरांना वाचून दाखविले. या ग्रंथाच्या वाचनामुळेच कोसंबी बौद्ध धर्माकडे वळले. बुद्ध चरित्राच्या वाचनाने प्रभावित झालेल्या कोसंबींनी ग्रंथाचे लेखक केळुसकरांना भेटण्याची इच्छा काशीनाथ रघुनाथ या आपल्या मित्राकडे व्यक्त केली. परंतु पुढे अनेक वर्षानंतर आपल्या 'निवेदन' या आत्मवृत्तात 'गोविंद नारायण काणेकृत 'जगद्गुरू गौतम बुद्धाचे चरित्र' वाचून आपण तल्लीन झाल्याचे' धर्मानंद कोसंबी नोंदवतात.

गोविंद नारायण काणेकृत 'जगद्गुरू गौतम बुद्धाचे चरित्र' हे जुलै १८७९ मध्ये लंडनहून प्रकाशित झालेल्या एडविन अर्नोल्ड यांच्या 'लाइट ऑफ एशिया' या पद्यमय ग्रंथाचे भाषांतर आहे. गोविंद काणेंचे बुद्धचरित्र वाचून बौद्ध धर्माचे ज्ञान संपादणे हे आपले जीवितकार्य निश्चित केल्याचे धर्मानंद कोसंबी आपल्या आत्मवृत्तात नोंदवतात. पुढे समग्र बौद्ध वाङ्मयाचे अवलोकन केल्यावर धर्मानंद कोसंबींनी केळुसकरांच्या बुद्ध चरित्राविषयी मतभेद व्यक्त केले. केळुसकरांची वैज्ञानिक दृष्टी विचारात घेता हे मतभेद बौद्धिक नव्हते तर बुद्ध परंपरा आधुनिक भारतात आपल्यापासून सुरू होते हे ठसवण्याचा एक 'कोता' प्रयत्न होता असेच आज म्हणावे लागते.

याउलट गोविंद काणे यांचे बंधू डॉ. काणे व विनायकराव ओक यांनी केळुसकरांच्या बुद्ध चरित्राची प्रशंसा केली. केळुसकरांचे हे बुद्धाचे चरित्र वाचूनच डॉ. आनंदराव नायर यांनी बौद्ध धर्माचा अभ्यास केला आणि त्या धर्माची दीक्षा घेतली. एका सभेत बोलताना डॉ. नायर यांनी 'केळुसकरकृत बुद्ध चरित्रापासून आपण स्फूर्ती घेऊन बौद्ध धर्माच्या प्रचारास वाहून घेतल्या'चे स्पष्ट केले होते.

एकूणच कोसंबींनी बौद्ध धर्माला दिलेले योगदान जसे महत्त्वाचे आहे तसेच सयाजीरावांनी या कामात कोसंबींना दिलेले पाठबळसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. कारण राज्यकर्त्यांचा पाठिंबा हा कोणत्याही कामाला पुढे नेण्यासाठी महत्त्वाचा असतो. सयाजीरावांनी जगभराच्या सर्वच सकारात्मक कामांना कोणताही भेदभाव न करता आयुष्यभर पाठबळ दिले. यामागे सयाजीरावांची मानव कल्याणाची वैश्विक दृष्टी प्रतीत होते. कोसंबींच्या बौद्ध कार्याला महाराजांनी दिलेले पाठबळ कोसंबी, महाराष्ट्र, बौद्ध धर्म आणि बाबासाहेबांचे धर्मांतर यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पाठबळ देणारे ठरले एवढे मात्र निश्चित.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर


आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specchess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com